# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.06.2024** **वार – गुरुवार**

---

**<u>सुनेत्रा पवार</u>**

राज्यसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीनं सुनेत्रा पवार यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, नरहरी झिरवाळ, मंत्री छगन भुजबळ यावेळी उपस्थित होते. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांच्याशिवाय इतर कुणीही अर्ज भरलेला नसल्याने बिनविरोध निवडून येण्याचा सुनेत्रा पवार यांचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सर्वांच्या सहमतीने सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय झाल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान सुनेत्रा पवार यांची उमेदवारी निश्चित झाल्यानं पुण्याप्रमाणेच बारामतीला देखील एक राज्यसभेचा आणि एक लोकसभेचा असे दोन खासदार मिळणार आहेत. पुण्यातून मेधा कुलकर्णी यांची राज्यसभेवर निवड झाली आहे आणि मुरलीधर मोहोळ लोकसभा निवडणुकीत विजयी होऊन खासदार आणि आता केंद्रात राज्यमंत्रीही झाले आहेत. तर दुसरीकडे बारामती मतदार संघातून सुप्रिया सुळे लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्या आणि आता सुनेत्रा पवार यांची राज्यसभेच्या जागेसाठी उमेदवारी जाहीर झाली आहे.

**<u>सी-डॅक</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि सी-डॅकच्या सहकार्यानं भोसरीमध्ये संगणक प्रशिक्षण, आणि संशोधनासाठी अत्याधुनिक आणि सुसज्ज इमारत बांधण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात इथं 650 विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल.

**<u>एसटी</u>**

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन होणार आहेत. त्यामुळे बदल्यांबाबतचे आक्षेप कमी होऊन सेवाजेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्यायाची हमी शक्य होईल अशी माहिती जनसंपर्क अधिकारी अभिजित भोसले यांनी दिली.

**<u>माजी खासदार संभाजीराजे</u>**

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे आणि राज्य सरकारने एकत्र बसून मराठा समाजासाठी न्याय्य भूमिका घ्यावी, असं आवाहन  स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी मांडली. ते आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.

**<u>पाणीपुरवठा</u>**

पिंपरी चिंचवडमधल्या मोशी, चऱ्होली, चोवीसावाडी, वडमुखवाडी, चिखली, डुडुळगाव, भोसरी, दिघी, आणि इंद्रायणीनगर या ठिकाणचा पाणीपुरवठा आजपासून येत्या 15 तारखेदरम्यान अनियमित आणि विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणी काटकसरीने वापरावं असं आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी केलं आहे.

**<u>आयुक्त बैठक</u>**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार रहा, नागरीकांचे फोन येण्याची वाट पाहत बसू नका, अशा सक्त सूचना महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. गेल्या आठवड्यात शहरात झालेल्या मुसळधार पावसाने अनेक रस्त्यांवर पाणी साचलं. त्यानंतर सर्वच पक्षांनी प्रशासनावर टीका केली. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी महापालिकेतील सर्व अधिकारी आणि खाते प्रमुखांची आज  बैठक घेतली.

**<u>आंदोलन</u>**

पुण्यात वारंवार होणाऱ्या जीवघेण्या अपघातांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात आज कोंढवा-कात्रज रस्त्यावर गोकुळनगर इथं तीव्र आंदोलन करण्यात आलं. यावेळी जगताप यांनी प्रशासनाच्या कारभारावर आणि सरकारच्या धोरणांवर टीका केली.

**<u>मुद्दे माल जप्त</u>**

राज्य उत्पादन शुल्काच्या भरारी पथकानं शिरुर तालुक्यात शिक्रापूर गावात अवैध दारुनिर्मिती करणाऱ्या अड्ड्यावर कारवाई केली. या ठिकाणावरून 1300 लिटर रसायन आणि 70 लिटर गावठी दारु असा 59 हजार 700 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**<u>ससून</u>**

गेल्या काही दिवसात ससून रुग्णालयात झालेल्या घटनांच्या चौकशीसाठी विशेष तपास पथकाची स्थापन करावी अशी मागणी महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्सचे अध्यक्ष हाजी जुबेर मेमन यांनी केली आहे.

**<u>अल्पवयीन</u>**

कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाबरोबर पबमधील पार्टीत सामील झालेल्या 15 मुलांची पोलिसांणी चौकशी केली. पार्टीत सामील झालेल्या मुलांनी प्रत्येकी अडीच हजार रुपये जमा केले होते. उर्वरित 48 हजारांचे बिल अपघात करणाऱ्या अल्पवयीन मुलाने दिल्याची माहिती चौकशीत मिळाली. अपघातापूर्वी अल्पवयीन मुलगा पार्टी करण्यासाठी कोझी आणि ब्लॅक पबमध्ये गेला होता.

**<u>टॅक्स प्रॅक्टिशनर्स</u>**

महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲडव्होकेट प्रसाद देशपांडे यांची निवड झाली आहे. नुकत्याच झालेल्या 44व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 2024-25 या वर्षासाठी नवी कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान आहे. उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**